# विश्व हिंदू महासंघ (भारत)

## ◌ नियमावली ◌

विसाव्या शतकात सत्तरच्या दशकामध्ये विश्वामध्ये सनातनधर्म, आर्य संस्कृती व हिंदूत्वाला वाढत्या संकटांपासून सावधान करण्यासाठी तसेच आपली संस्कृती विसरून चालणाऱ्या लोकांना योग्य मार्ग दाखवण्यासाठी, आद्यजगद्‌गुरु शंकराचार्यांनी स्थापित केलेल्या चार पीठांचे शंकराचार्य, गोरक्षपीठाधीश्वर महंत अवैधनाथजी महाराज, विश्व हिंदू परिषदेचे माननीय श्री अशोकजी सिंघल व नेपाळ नरेश विरेंद्रवीर विक्रमशाहदेव यांच्या उपस्थितीत दिनांक १२ एप्रिल १९८१ (श्रीराम नवमी) दिवशी पिंपरा, विरभंज धर्मपुरी, नेपाळमध्ये हिंदूना संगठीत करण्याचा पहिला प्रयत्न आंतरराष्ट्रीय हिंदू सम्मेलनात झाला, त्या संमेलनाला 'छत्री संमेलन' (Umbrella Organization) म्हणूनही ओळखलं जातं. विश्व हिंदू संमेलन म्हणून संयुक्त राष्ट्रसंघ (UNO) मध्ये (रजि.नं. २५/२०४०) असे रजिस्ट्रेशन वर्ष १९८४ मध्ये झाले. दुसरे आंतरराष्ट्रीय संमेलन नेपाळमध्ये २४ मार्च ते २८ मार्च १९८८ मध्ये झाले. या ठिकाणी याच नाव विश्व हिंदू महासंघ (World Hindu Federation) असं ठेवण्यात आलं. याचे केंद्रीय कार्यालय नेपाळमध्ये काठमांडू येथे स्थापन करण्यात आले. महासंघाने कार्यासाठी संपुर्ण विश्वात वेगवेगळ्या प्रकारची सभा व समित्या तयार केल्या आहेत, ज्यांना महासंघाचे अवयव असे म्हटले जाते. जसे संरक्षक मंडळ, धर्मसभा, महासभा, कार्यकारिणी समिती, न्यायमंडळ ईत्यादी। नियमित असणारे सभासद यावरील पदे ग्रहण करत असतात.

विश्व हिंदू महासंघाच्या अंतर्गत वैदिक, बौद्ध, जैन, नागा, ओंकारावर विश्वास ठेवणारे तसेच कोणत्याही प्रकारे भारतीय संस्कृतीवर विश्वास ठेवणारे लोक सामिल आहेत. हे लोक त्यांच्याद्वारे साहित्याच्या व भाषांच्या माध्यमातून शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, दार्शनिक अर्थात सर्वच स्तरावर संपुर्ण हिंदू समाजाला हिंदू संस्कृती टिकवून ठेवण्याचे कार्य करतात. हाच महासंघाचा उद्देश आहे. गोहत्या विरोध, पुनर्जन्मावर विश्वास, वसुधैव कुटुंबकम संस्कृतीची रक्षा व विस्तार हे मूळ उद्देश आहेत.

विश्व हिंदू महासंघाचे सर्वप्रथम आंतरराष्ट्रीय अध्यक्ष श्री. नागेंद्र प्रसाद रिजाल, दुसरे श्री कृष्ण गोपाळ टंडन, तीसरे श्री. भरतकेसर सिम्हा, चौथे वर्तमान आंतरराष्ट्रीय अध्यक्ष नेपाळचे कर्नल हेमबहादूर कार्की आहेत.

भारतीय संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष गोरक्ष पीठाधीश्वर तथा मुख्यमंत्री उत्तरप्रदेश महंत योगी आदित्यनाथजी महाराज आहेत.

विश्व हिंदू महासंघाच्या एकमेव छत्री हिंदू संघटनेत भारत, नेपाळसहित जगातील ९७० छोटे-मोठे संघटन संबद्ध आहेत. हे एकमात्र विश्वातील हिंदू संघटन आहे की, याला संयुक्त राष्ट्रसंघाच्या अंतर्गत कार्य करणाऱ्या युनेस्कोने २४ जुलै १९९१ ला मान्यता दिली आहे. यांचे सदस्य देश आहेत - ऑस्ट्रेलिया, बांगलादेश, बेल्जीयम, म्यानमार, कॅनडा, डेन्मार्क, फिजी, गयाना, हाँगकाँग, हॉलंड, भारत, इंडोनेशिया, केनिया, मलेशिया, मॉरिशस, न्यूझीलंड, नॉर्वे, नेपाळ, पाकिस्तान, सिंगापूर, द.आफ्रिका, श्रीलंका, द. कोरिया, सुरीनाम, स्विडन, टांझानिया, थायलंड, त्रिनिदाद, इंग्लंड, अमेरिका, जर्मनी, आर्यलंड इत्यादी.

## विश्व हिंदू महासंघाचे संविधान -

विश्व हिंदू महासंघ आपल्या नावाशी अनुरूप हिंदू राष्ट्रवादाच्या प्रति समर्पित भावाने कार्य करत संपुर्ण विश्वातील हिंदूत्वाच्या मतानूसार वैदिक, बौद्ध, जैन, शिख तसेच ईतर धर्मीय जे की हिंदू संस्कृतीवर विश्वास ठेवतात अश्यांना संपुर्ण हिंदू परिवारात सामिल करण्यासाठी कार्य करेल.

१) **नाव** - विश्व हिंदू महासंघ

२) **केंद्रीय कार्यालय** - काठमांडू, नेपाळ

३) **कार्यक्षेत्र** - संपुर्ण विश्व

४) **परिभाषा** - खालीलप्रमाणे -

अ) संविधानाचा अर्थ म्हणजे विश्व हिंदू महासंघाचे संविधान.

ब) संघाचा अर्थ म्हणजे विश्व हिंदू महासंघ

क) हिंदूचा अर्थ म्हणजे जो कोणी खाली दिलेल्या आचरण संहितेचा स्विकार करतो तो-

- ओंकारावर विश्वास व श्रद्धा.
- गोवंश व गोहत्या विरोध.
- पुर्नजन्मावर विश्वास.
- संपुर्ण विश्वाला मातृभूमी मानतो.
- हिंदू धर्मग्रंथावर संपुर्ण विश्वास.

## महासंघाची सदस्यता -

संस्थेच्या सदस्यतेसाठी खाली दिलेल्या विवरणानूसार तीन प्रकार आहेत -

**१) आंतरराष्ट्रीय अध्यक्ष -**

हे एकमात्र पद राहील ज्याच्या अधिन संपुर्ण विश्वातील विश्व हिंदू महासंघाचे सर्व देशातील राष्ट्रीय अध्यक्ष असतील.

**२) भारतीय महासंघाचे अध्यक्ष -**

राष्ट्रीय अध्यक्ष हे ही एकमात्र पद असेल आणि या पदावर श्री गोरखपीठाधीश्वर महंत यांच्याद्वारे नियुक्त केलेला व्यक्ती अध्यक्ष राहील.

**३) राष्ट्रीय अध्यक्षांचे अधिकार तसेच कर्तव्य -**

हे संस्थेचे सर्वोच्च अधिकारी असतील. सामान्य परिस्थितीत जर त्यांना कार्यकारिणीची बैठक घेणे आवश्यक वाटेल तेव्हा घेऊ शकतात. संस्थेच्या विवादात्मक आपातकालीन परिस्थितीत हस्तक्षेप करून निर्णय घेण्याचा त्यांना अधिकार आहे. त्यांचा निर्णय संस्थेच्या सर्व पदाधिकारी यांना बाध्य असेल.

**आजीवन सदस्य -**

संस्थेचे आजीवन सदस्यत्व घेण्यासाठी ............ रूपये भरून घेता येईल. आजीवन सदस्य संस्थेच्या कार्यकारिणीचे सदस्य अथवा पदाधिकारी बनू शकतात.

**सक्रीय सदस्य -**

ज्या सदस्याला अध्यक्षांनी मान्यता दिली आहे तो सदस्य .......... शुल्क भरून सदस्य होऊ शकतो. सक्रीय सदस्य निवडीद्वारे कार्यकारिणी सदस्य किंवा पदाधिकारी बनू शकतो.

**विशेष आमंत्रीत सदस्य -**

संस्था मार्गदर्शनासाठी विशेष कार्य करणाऱ्या व्यक्तींना विनाशुल्क सदस्यत्व देते. असे सदस्य विशेष सभेत भाग घेऊन त्यांचा सल्ला देऊ शकतात पण त्यांना मतदानाना अधिकार असणार नाही.

**सदस्यत्वाची मागणी -**

खाली दिलेल्या परिस्थितीत सदस्यत्व रद्द होईल.

१) सदस्याच्या मृत्यूनंतर

२) मानसीक रोगी झाल्यास

३) संस्थेच्या विरोधात कार्य केल्यास

४) राजीनामा दिल्यास तसेच अविश्वास प्रस्ताव मान्य झाल्यास

५) कोणत्याही न्यायालयाने गंभीर अपराधात दंड केल्यास

**संघटन :-**

संघटनात्मक दृष्टीकोनातून संस्थेच्या खालील समित्या -

१) प्रदेश कार्य समिती

२) जिल्हा कार्य समिती

३) तालूका कार्य समिती

४) जिल्हा परिषद कार्य समिती

५) ग्राम पंचायत कार्य समिती

**महानगर व नगर भागात -**

१) महानगरपालीका कार्य समिती

२) नगरपालीका कार्य समिती

३) शहर कार्य समिती

४) वार्ड कार्य समिती

**व्यापक कार्यासाठी -**

१) मिडीया सेल

२) आय.टी. सेल

३) मिडीया प्रभारी

## - विश्व हिंदू महासंघाच्या पदाधिकारी यांचे अधिकार -

**अध्यक्ष :-**

- नियुक्त अध्यक्ष हेच कार्यकारिणीचे अध्यक्ष असतील.
- कार्यकारिणीच्या बैठकीचे अध्यक्षपद यांचेकडेच राहील.
- प्रभारी यांच्याशी सल्लामसलत करून पदाधिकारी यांच्या नियुक्ती व बरखास्ती.
- कोणत्याही पदाधिकारी यांच्याशी विचार विमर्श न करता स्वतः निर्णय घेऊ शकतात.
- संपुर्ण कार्यकारिणी नियोजीत व संचालीत करण्याची जबाबदारी असेल.
- कोणत्याही विवादावर अध्यक्षांचा निर्णय अंतीम असेल आणि तो सर्वांना मान्य असेल.

**प्रभारी :-**

- अध्यक्षाचा प्रतिनिधी म्हणून संघटनेचे संयोजन / मार्गदर्शन करणे व पदाधिकाऱ्यांना सोबत घेऊन चालणे.
- अध्यक्षांच्या मार्गदर्शनाखाली पदाधिकारी व कर्मचारी यांच्या नियुक्त्या करणे.
- अध्यक्षांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेच्या पदाधिकारी कर्मचारी यांच्या विरोधात कार्यवाही करणे.

**उपाध्यक्ष :-**

- अध्यक्षांच्या अनुपस्थितीत बैठकांचे अध्यक्षपद भूषविणे व चर्चा करणे.
- अध्यक्षांच्या अनुमतीने संस्थेचे कार्य पुढे नेणे.

**महामंत्री :-**

- अध्यक्षाच्या अनूमतीने बैठका आयोजित करणे.
- संस्थेच्या वतीने सर्व बील व व्हाऊचर पारित करून त्यांचे रेकॉर्ड ठेवणे.
- संस्थेचे ऑडीट करून रेकॉर्ड सुरक्षित ठेवणे.
- कार्यकारिणी बैठकीच्या सुचना पाठवणे व मिनीट बुक तयार ठेवणे.
- अध्यक्षांच्या निर्देशानुसार सर्व संबंधीत पदाधिकाऱ्यांना माहिती देणे व अध्यक्षांना प्रत्येक माहिती यथासमय सांगणे.
- लेखापरिक्षण अध्यक्षांच्या अनूमतीने बैठकीत मांडणे व पारीत करणे.

**कोषाध्यक्ष :-**

- संस्थेचा संपुर्ण आर्थिक व्यवहार चोख ठेवणे.
- संस्थेच बँक प्रणाली नियमीत संचालीत ठेवणे.
- संस्थेच्या आय-व्ययाची रेकॉर्ड सुरक्षित ठेवणे व कोष सांभाळणे.

**मंत्री :-**

संस्थेच्या वेगवेगळ्या मंत्र्यांना कार्याचे वाटप अध्यक्ष व प्रभारी यांच्या सहमतीने केले जाईल. हे कार्य करणे मंत्र्यांना बाध्य राहील.

**सहप्रभारी -**

संस्थेच्या वेगवेगळ्या प्रभारी यांना कार्याचे वाटप अध्यक्ष व प्रभारी यांच्या सहमतीने केले जाईल व ते त्यांना बाध्य राहील.

**कार्यालय प्रभारी -**

कार्यालय प्रभारी याचे अधिका प्रभारी सारखेच असतील पंरतू कार्यालयातील जबाबदारीचे.

**मिडीया प्रभारी -**

मिडीया प्रभारी संस्थेचे कार्य प्रचार व प्रसार करण्यासाठी संचार माध्यम तसेच वर्तमानपत्रांना आवश्यक ती माहिती पुरवणे व यांचे संग्रहण करणे.

**संपर्क प्रमुख -**

संपुर्ण कार्यक्षेत्राच्या अंतर्गत अध्यक्ष व प्रभारी यांच्या निर्देशानुसार वेगवेगळ्या भागात संपर्क करणे / संवाद वाढवणे / नव्या सदस्यांचा शोध घेऊन त्यांना संस्थेच्या कार्यात सहभागी करणे.

## विश्व हिंदू महासंघाची कार्यकारिणी -

| | | |
|---|---|---|
| ○ अध्यक्ष | - | १ (एक) |
| ○ प्रभारी | - | १ (एक) |
| ○ महामंत्री | - | १ (एक) |
| ○ कोषाध्यक्ष | - | १ (एक) |
| ○ उपाध्यक्ष | - | ५ (पाच) |
| ○ सहप्रभारी | - | ५ (पाच) |
| ○ मंत्री | - | ५ (पाच) |
| ○ मिडीया प्रभारी | - | प्रिंट माध्यम २ (दोन)<br>सोशल माध्यम २ (दोन) |
| ○ कार्यालय प्रभारी | - | १ (एक) |
| ○ संपर्क प्रमुख | - | १ (एक) |
| ○ कार्यकारिणी सदस्य | - | २५ (पंचवीस) |

- **संस्थेचा कोष -**

  संस्थेचा एकच कोष राहील. या कोषाचे संचालन अध्यक्ष-प्रभारी-कोषाध्यक्ष यापैकी दोनजण करतील. कोषाचे संपूर्ण विवरण प्रभारी-अध्यक्ष ठेवतील. यांच्या सहीने जमा झालेली व काढलेली रक्कम अध्यक्षांना सांगणे आवश्यक असेल.

- **संस्थेचा ध्वज -**

  संस्थेच्या ध्वजाचा आकार त्रिकोणी भगवा रंगाचा आहे. तो संस्थेच्या कार्यक्रमात फडकवला जाईल.

- **संस्थेचे आदर्श वाक्य -**

  ।।भारत माता की जय।।　　।।वंदे मातरम्।।

---

◌ **संस्थेचे ध्वजगान -**

आहिंदू कूश भारत खंड मे,
सप्त-द्वीप मे, भुवन - अण्ड मे,
धर्म नितीमय कनक दण्ड मे,
लहर, लहर लहरे - केशरिया ध्वज फहरे।।।

रामकृष्ण अर्जुन के रथ का,
बलिदानी ज्योतिर्मय पथ का,
तपस का ध्यान ज्ञान का,
चिर निशान फहरे, केशरिया ध्वज फहरे।।।

वीर शीवा, राजा प्रताप का,
भगवा ध्वज प्यारा,
छत्रसाल, गुरु गोविंदसिंह का,
यह निशान प्यारा
देश धर्मपर बलि बलि जाने
का आह्वान करे, केशरिया ध्वज फहरे।।।।

आओ इसी ध्वजा के निचे,
पुनजागरण मंत्र उच्चारे,
कीर्तीशेष इतिहास उबारे,
क्षत-विक्षत भूगोल संवारे,
फिर गांडीव उठे हाथो में,
पांचजन्य मुखरे, केशरिया ध्वज फहरे।।।।।

- **आंतरराष्ट्रीय अध्यक्ष -**
कर्नल हेमबहादूर कार्की

**-राष्ट्रीय अध्यक्ष -**
महंत योगी आदित्यनाथ महाराज

-**महाराष्ट्र राज्याध्यक्ष** -
महंत मुकुशनाथजी महाराज

**-महाराष्ट्र कार्याध्यक्ष -**
श्री. बजरंग कुरिल जी.

-**मराठवाडा कार्याध्यक्ष -**
श्री. अजयजी रेड्डी

**- लातूर जिल्हा कार्याध्यक्ष -**
श्री. संगमेश्वर स्वामी

-श्री**. नंदकिशोर रामचंद्र झवर-**
प्रांत अध्यक्ष पश्चिम महाराष्ट्र
(ग्रामीण)

- **श्री. विनीत विजय ढेपे-**
जिल्हा अध्यक्ष सोलापूर

**-श्री. सतीश अर्जुन आनंदकर -**
प्रांत संघटन महामंत्री पश्चिम महाराष्ट्र

**- श्री. उपेंद्र नागनाथ दासरी-**
शहर अध्यक्ष सोलापूर

**-श्री. शशिकांत बाबुराव पगडे-**
जिल्हा संघटन महामंत्री सोलापूर
(सोलापूर)

**-श्री. रोहित किशोर परदेशी-**
शहर संघटन महामंत्री

**-श्री. विनायक दत्तात्रय नांदल -**
उपाध्यक्ष शहर सोलापूर
सोलापूर

**- श्री. विठ्ठल संगमेश्वर सरवदे-**
जिल्हा गौ रक्षण प्रमुख

**(दिनांक 15 डिसेंबर 2022, गुरुवार)**